# पर्यावरण रक्षणासाठी महामेट्रोकडून जागतिक पातळीच्या  पद्धतीने वृक्षांचे पुनर्रोपण

दिनांक: ९ डिसेंबर, २०१७: पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर परिसरात सध्या महामेट्रोच्या वतीने मेट्रो प्रकल्पांच्या दोन मार्गिकांचे काम सुरू आहे. हे काम सुरू असताना प्रकल्पाच्या मार्गात अनेक वृक्षांचे अडथळे येत आहेत. सदर वृक्षांचे पुनर्रोपण ही संपूर्णत: महामेट्रोची जबाबदारी असून त्या अंतर्गत या वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात येणार असल्याची माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षित यांनी  दिली.

सदरहू मेट्रोच्या कामामध्ये काही वृक्षांचा अडथळा होत आहे. या वृक्षांचा सर्वे झाल्यानंतर एक्सपर्ट कमिटीच्या सभासद मार्फत सर्वे करण्यात येतो . असाच सर्वे पिंपरी ते  हॅरिस ब्रिज दरम्यान करण्यात आला आहे . त्यामध्ये १३५ झाडांचे पुनर्रोपण करण्याचे निश्चित झाले आहे. पुनर्रोपणचे काम अधिक चांगल्या प्रकारे व्हावे म्हणून महामेट्रोने दोन प्रकारचे पुनर्रोपणाचे प्रात्यक्षिक आयोजित केले आहे . त्यामध्ये सर्वसाधारणपणे केले  जाणारे पुनर्रोपण आणि दुसरे जागतिक धर्तीवर मान्य केलेले वृक्षाचे पुनर्रोपण त्यानुसार दोन्ही प्रकारच्या पुनर्रोपणचे  काम नाशिक फाटा ते खराळवाडी दरम्यान चालू आहे .   त्यानुसार वृक्षांच्या पुनर्रोपणाचे काम   सुरु  आहे .

पुणे मेट्रोच्या बांधकामामधील जास्तीत जास्त झाडे वाचवण्यामध्ये पुनर्रोपणाचे काम मोठ्या प्रमाणात  करण्यात  येणार आहे . तसेच अगदी शेवटचा पर्याय म्हणून व कुठलाच इतर पर्याय नसल्यास अशी झाडांची तोड मात्र थोड्याप्रमाणात होणार आहे .मेट्रो प्रकल्पामुळे पुणे शहराच्या हरिती करणामध्ये तूट पडू नये म्हणून तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या बदल्यात प्रतिवृक्ष दहा झाडे लावली जाणार आहेत . याशिवाय शहराच्या हरितीकरणामध्ये अधिक वाढ व्हावी म्हणून पिंपरी चिंचवड शहर परिसरात किमान ३ हजार तसेच पुणे महानगर परिसराच्या हद्दीमध्ये ३ हजार झाडे लावण्याच्या दृष्टीने  महामेट्रो प्रयन्तशील आहे , पुणे महानगर पालिकेमध्ये वनविभागाच्या पाचगाव पर्वती वनविहार ( तळजाई ) या ठिकाणी वनविभागाने वृक्षलागवडीसाठी १० एकर क्षेत्रासाठी  परवानगी दिली आहे . आतापर्यंत दोन हजार स्थानिक  प्रजातींची   वृक्षाची लागवड करण्यात आली आहे . उर्वरित उद्दीष्ट्येही डिसेंबर अखेर पूर्ण करण्यात येणार आहे . पिंपरी चिंचवड परिसरामध्ये दिघी येथील आर्मी दलाने वृक्ष लागवडीसाठी परवानगी दिली आहे . त्यानुसार वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात येत आहे . नागरिकांना मेट्रो विभागास कामकाजाची माहिती व्हावी यासाठी वल्लभनगर  एस टी स्टॅन्ड मागे येथे

सहयोग केंद्राची उभारणी करण्यात आली आहे . येथे ४० झाडे लावण्यात आली आहे . तसेच छोटीशी बाग विकसित केली आहे . याशिवाय चांगल्या प्रकारे सुशोभीकरण करण्यात आले आहे .

आकुडी येथे पिंपरी चिंचवड विकास महानगर पालिकेकडून पाच एकर क्षेत्र आकुर्डी येथे उपलब्ध करून दिले असून याठिकाणी सुद्धा १२५ झाडे लावण्यात आली आहेत . सदरहू जागेमध्ये योजनाबद्ध उपवन विकसित करण्याची प्रक्रिया चालू आहे . या अंतर्गत एकूण ६०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट्य गृहीत धरले आहेत . मेट्रो लाईन मध्ये सुमारे ३ ते ४ वर्षाची २०० झाडे असून त्यापैकी अडथळा करण्याऱ्या ६० वृक्षाचे पुनर्रोपण पिंपरी येथील गुलाब पुष्प वाटिका येथे करण्यात आले आहे . त्या वृक्षांची वाढ चांगल्या प्रकारे होत आहे .

सहयोग केंद्रात १० वृक्षाचे पुनर्रोपण करण्यात येत आहे .

वृक्षांच्या पुनर्रोपणाचे काम प्रामुख्याने दोन प्रकारे केले जाते . १) सर्वसाधारणपणे पद्धत ( प्रचलित पद्धत ) २) जागतिक पद्धत

सर्वसाधारण प्रकारांमध्ये वृक्षाची मध्य वेढी घेऊन मुळांचा भार आवश्यक तेवढया प्रमाणात घेऊन क्रेनच्या साह्याने उचलून ज्या ठिकाणी वृक्ष लावायचा त्या ठिकाणी पाठविला जातो . तर विश्वमान्य पद्धतीमध्ये वृक्षाच्या खोडाचा डीबीएच गृहीत धरून त्यांच्या आठ पट खोदाई करून मुळाचा भार मोठ्या क्षमतेच्या क्रेनने उचलला जातो आणि ज्या ठिकाणी लावायचे आहे त्याठिकाणी लावला जातो. या कामामध्ये अर्बोरिस्ट यांच्या मार्गदर्शनानुसार काम केले जाते . त्यामुळे सर्वसाधारण पद्धतीपेक्षा नवीन पद्धतीच्या कामाचा खर्च जरी जास्त असला तरी त्यामध्ये वृक्षांना अतिशय कमी इजा पोहचली जाते व झाडे जगण्याचे प्रमाण सर्वसाधारण पद्धतीपेक्षा अधिक आहे . याठिकाणी जास्तीत जास्त वृक्ष अधिक चांगल्या पद्धतीने वाढतील याकडे मेट्रो खूप लक्ष देतो . मेट्रोने खर्चाकडे पाहिलेले नाही . आणि वृक्षांना अधिक प्राधान्य दिले आहे .